BA III Sem VI 2020-21
Developmental Psy.
Paper XIV DSE-E-213
Dr. Vinayak Honmore

Module : 2

Infancy and Childhood

शैशवावस्था आणि बाल्यावस्था

प्रस्तावना :

बाळाच्या जन्माच्या पंधरा दिवसानंतर शैशवावस्थेच्या कालखंडास सुरुवात होते ती वयाच्या दोन वर्षापर्यंत चालते. या अवस्थेच्या पहिल्या वर्षात बाळास अर्भक तर दुसऱ्या वर्षात शिशु म्हटले जाते. मलमूत्र (शी-शु) विसर्जनावर नियंत्रण याच अवस्थेमध्ये केले जात असल्याने यास शिशुअवस्था असे देखील म्हटले जाते. वयाच्या दोनवर्षानंतर ते लैंगिक परिपक्वता प्राप्त होई पर्यंतचा कालावधी बाल्यावस्था म्हणून ओळखला जातो. बाल्यावस्थेचे पूर्व व उत्तर बाल्यावस्था असे दोन भाग पडतात. या दोन्ही अवस्थांदरम्यान कारक, बोधनिक, विकास कसा घडतो याचा नंतरच्या विकासावर मोठा प्रभाव पडतो.

2.1 Developing the roots of Sociability सामाजिकतेची पायाभरणी / सामाजिकतेच्या मुलविकास :

शैशवावस्थेमधील मुलामुलींच्या सुजनता किंवा सहकारितेचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा ते सामाजिक तसेच भावनिक बंधाचा विकास कसे करतात, कुटुंबियांशी, समवयस्क यांच्याशी कश्या पद्धतीने आंतरक्रिया करतात हे पहाणे महत्वाचे ठरते.

एक स्मित हास्य, प्रेमाचा अथवा रागाचा कटाक्ष, कर्कश आवाजामुळे बदलणारे हावभाव इ.ची प्रतिबिंब बाळाच्या चेहऱ्यावर उमटत असते. त्याप्रमाणे प्रौढांच्यामध्ये भावनिक अनुभूती होते त्याप्रमाणेच शिशु भावनिक अनुभूती अनुभवतात का? इतर व्यक्ती भावनिक दृष्ट्या काय अनुभवत आहे हे उमगण्याची समज त्यांच्यामध्ये कधी येते? व्यक्तींच्या भावनिक स्थितींच्या आधारे त्यांच्या परिवेशाचे आकलन कसे करतात? एकंदरीतच भावनिक व सामाजिक दृष्ट्या शिशु कसे विकसित होतात हे समजून घ्यायचे झाल्यास वरील प्रश्नांची उत्तरे शोधणे क्रमप्राप्त ठरते.

(A) Emotions in Infancy : Do Infants experience emotional highs & lows?

शैशवावस्थेमधील भावना : शिशु त्यांच्या भावनिक स्थितीचे प्रदर्शन करणारे हावभाव चेहऱ्यावर प्रदर्शित करीत असतात. ज्या परिस्थितीमध्ये त्यांनी आनंदी असावे असे आपणास अपेक्षित असते त्यावेळी ते हसताना पहावयास मिळतात. जेव्हा ते वैफल्यग्रस्त झाले असे आपण गृहित धरतो तेव्हा ते राग, संताप प्रदर्शित करताना दिसतात. तर जेव्हा ते दुःखी असावेत असे वाटते तेव्हा ते उदास निराश दिसतात.

अधिकतर विभिन्न संस्कृतीमध्ये चेहऱ्यावरील मुलभूत हावभाव हे जवळपास सारखे असल्याचे दिसते. लहान मुलं मग ती भारतामधील असोत, अमेरिकेमधील अथवा आफ्रिकेतील आदिवासी भागातील, मुलभूत भावनांची अभिव्यक्ती जवळपास सारखीच असते. तसेच भावनांचे अभाविक संप्रेषण पाभिमानरीत अभाविक संकेत हे सुद्धा जवळपास सर्व वयोगटातील व्यक्तींमध्ये सुसंगत असल्याचे दिसून येते. एकंदरीत आपण सर्वजण मुलभूत भावनांच्या अभिव्यक्तीच्या क्षमता घेऊनच जन्मास आलो आहोत यावर संशोधकांचे एकमत होताना दिसते.

शिशु अनेकविध प्रकारच्या भावनांची अभिव्यक्ती करताना दिसतात. अधिकतर मातांच्या मते एक महिन्याचे बाळ आनंद आणि आवड याविषयीची अभाविक सूचके वर्तनातून, चेहऱ्यावरून प्रदर्शित करतात. 84% मातांच्या मते त्यांचे बाळ राग व्यक्त करते, 75% आश्चर्य, 58% भीती,

उदा. रिवणारा व्यक्त करीत असल्याचे मान्यांनी कबूर केले आहे. Carroll Izard यांनी विकसित केलेल्या Maximally Discriminative Facial Movement Coding System (MAX) नुसार केलेल्या संशोधनांमध्ये जन्मावेळी आवड (रुची), दुःख, तिरस्कार इत्यादी भावना उपस्थित असल्याचे स्पष्ट झाले आहे. चार्ल्स डार्विन यांनी त्यांच्या पुस्तकात मनुष्य व वानरांमधील उच्च विकसित प्राण्यांचे नवजातांमध्ये भावनिक अभिव्यक्तींचा सार्वत्रिक संच असल्याचे पहावयास मिळते.

सर्वच शिशु सारख्या प्रकारच्या भावना व्यक्त करीत असल्या तरीही त्यांच्या भावनिक अभिव्यक्तीमध्ये भेद असतो. विभिन्न संस्कृतीमधील शिशुंच्या भावनिक अभिव्यक्तीमध्ये लक्षणीय भेद आढळतो जसे ११ महिन्यांचे चायनिज शिशु हे युरोपियन शिशुंच्या तुलनेत कमी अभिव्यक्त होताना दिसतात.

(I) Experiencing emotions

भावनांची अनुभूती : शिशु अनुभवत असणाऱ्या भावनांची अभिव्यक्ती त्यांच्या स्वाभाविक अभिव्यक्तीशी सुसंगत असते का? शिवाय प्रौढांना ज्याप्रमाणे भावनांचा अनुभव होतो त्याप्रमाणेच शिशुदेखील भावना अनुभवतात का!

या प्रश्नांची उत्तरे देण्यापूर्वी आपणास भावना म्हणजे काय हे समजून घ्यावे लागेल: वैकासिक तज्ज्ञांच्या मते एखाद्या भावनांमध्ये तीन घटकांचा समावेश होतो. पहिले म्हणजे जैविक झाकात्मक घटक (Biological Arousal Component) उदा: श्वासोच्छ्वासाच्या गतीत झालेली वाढ किंवा हृदयगतीमधील वाढ. दुसरे म्हणजे बोधात्मक घटक (Cognitive Component) उदा: क्रोध, भीती या भावनांप्रतीची जागरूकता. आणि तिसरे म्हणजे वार्तनिक घटक (Behavioral Component) उदा: एखादी व्यक्ती दुःखी असल्यास तिच्या भावना रडण्यातून व्यक्त करते.

ज्याप्रमाणे प्रौढ स्वाभाविक अभिव्यक्ती करतात त्याच पद्धतीने मुले जरी भावनांची अभिव्यक्ती करीत असले तरीदेखील त्यांचे प्रत्यक्ष अनुभव सारखेच असतील असे नाही. जर का या अभिव्यक्तीचे स्वरूप हे जन्मजात, नैसर्गिक असेल तर भावनिक अनुभवांच्या जाणिवांशिवाय अभिव्यक्ती व्यक्त होऊ शकते. याचा अर्थ स्वाभाविक अभिव्यक्ती ह्या भावनाविरहित आहेत का?

अधिकतर वैकासिक तज्ञ या मताशी सहमत नाहीत. त्यांच्या मते शिशुंमधील स्वाभाविक अभिव्यक्ती या खऱ्या भावनिक अनुभवांचे प्रतिनिधित्व करतात. भावनांच्या अभिव्यक्तीमध्ये केवळ भावनिक अनुभवांचे प्रतिबिंब असते असे नाही तर भावनांच्या नियंत्रणामध्ये देखील याची मदत होते. वैकासिक मानसशास्त्रज्ञ Carroll Izard यांच्या मते शिशु हे आनंद आणि दुःख यासारख्या मूलभूत भावनिक स्थितींचे प्रतिबिंब असणाऱ्या जन्मजात भावनिक अभिव्यक्तीने जन्मास येतात. शिशु वय जसजसे वाढत जातात त्यांच्या मूलभूत अभिव्यक्तींमध्ये सुधारणा घडते. व स्वाभाविक वार्तनिक अनुभवांच्या नियंत्रणांमध्ये पारंगत होतात. उदा: योग्य वेळी स्मितहास्य केल्याचे फायदे त्यांच्या लक्षात येतात. भाषिक कौशल्ये आत्मसात करण्यापूर्वी आपल्या गरजा आपली काळजी घेणाऱ्या व्यक्तींकडे स्वाभाविक पद्धतीने पोहचवणे यामुळे शक्य होते.

थोडक्यात काय शिशुमध्ये भावनांची अनुभूती होते. त्यांचे वय जसजसे वाढत जाते तसतसे संकीर्ण भावना व अनुभूती व्यक्त करण्यास सक्षम होतात. शिशुंच्या भावनिक अनुभवामधील प्रगती ही त्यांच्या मेंदूमधील सुधारणात्मक बदलांमुळे शक्य होते. पहिल्या तीन महिन्यामध्ये मेंदूचे बाह्यपटल

Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

(cerebral cortex) सक्रिय होते. ९ ते १० महिन्यादरम्यान लिंबिक यंत्रणा कार्यान्वित होते. अग्रखंडाशी समन्वय साधून लिंबिक यंत्रणा कार्य करण्यास सुरुवात करते परिणामी भावनांची विभक्त घेणी अस्तित्वात येते.

(II) Smiling हसणे : अनेकदा आपले छोटे बाळ गालातल्या गालात खुदकन हसले तेव्हा त्याला सुंदर स्वप्न पडले असेल असे त्याच्या आईवडिलांना वाटते. पण हे खरे आहे का? कदाचित नाही, झोपेदरम्यान प्रदर्शित होणारे स्मित हास्य यास फार कमी अर्थ असतो. याविषयी कोणीच खात्रीने सांगू शकत नाही. सहा ते आठ आठवड्यानंतर (लहान शिशु त्यांना आनंददायी वाटणाऱ्या उद्दीपकांकडे पाहून हसू लागतात. यामध्ये खेळणी, मोबाईल, पालक, आवडत्या व्यक्ती इत्यादींचा समावेश होतो. सर्वात पहिलांदा दिले जाणारे स्मितहास्य हे कोणत्याही विलयकडे किंवा आश्चर्यजनक उद्दीपकाकडे पाहून दिले जाते. तथापि वाढत्या वयानुसार ते त्यांच्या स्मितहास्याविषयी अधिक सजग होतात परिणामी काही विवक्षक गोष्टींनाच स्मितहास्याने प्रतिसाद देतात.

मनुष्य व्यतिरिक्त वस्तूंना दिल्या जाणाऱ्या स्मितहास्य ऐवजी इतर व्यक्तींना दिले जाणारे स्मितहास्य हे सामाजिक स्मितहास्य (social smile) म्हणून ओळखले जाते. मुलं जसजशी मोठी होत जातात तेव्हा त्यांचे सामाजिक हास्य हे विशिष्ठ व्यक्तींकडे निर्देशित होते. वयाच्या १८ महिन्यानंतर सामाजिक हास्य हे त्यांची काळजी घेणाऱ्या व्यक्तींकडे निर्देशित होते. एखादी प्रौढ व्यक्ती बाळाकडे दुर्लक्ष करते तेव्हा बाळाच्या स्मितहास्यामध्ये घट होते. थोडक्यात सांगायचे तर दुसऱ्या वर्षाच्या सरतेशेवटी आपल्या धनात्मक भावनांच्या संप्रेषणाकरिता अधिक उद्देशपूर्ण स्मितहास्याचा वापर केला जातो. तसेच इतरांप्रतिच्या भावनिक अभिव्यक्ती प्रती संवेदनशील होतात.

B) Stranger Anxiety and Separation Anxiety : It's only natural:

अनोळखी व्यक्ती प्रतिची चिंता आणि वियोग (विभक्त) चिंता :

एखादे बाळ कितीही मिळून मिसळून राहणारे असले तरीदेखील काही दिवसांनी एखाद्या अनोळखी व्यक्तीस पाहिल्यावर असे तोंड करते जणू काही अप्रिय, अनिच्छित गोष्ट तीने पाहिले आहे. परिणामी ते बाळ त्या व्यक्तीपासून दूर पळू लागते. आपण ज्यांना ओळखत नाही अशा कोणत्याही अनोळखी व्यक्तीसोबत राहावसे त्यांना वाटत नाही.

असे का होते? याचे उत्तर म्हणजे पहिल्या वर्षाच्या शेवटापर्यंत शिशुमध्ये अनोळखी व्यक्तीप्रतिची आणि वियोगात्मक चिंता अशा दोन्ही चिंतांची निर्मिती व्हायला लागते. 'शिशु जेव्हा एखाद्या अनोळखी व्यक्तीस समोरे जातात त्यावेळी प्रदर्शित होणारी खबरदारी अथवा सावधगिरीची प्रतिक्रिया म्हणजे अनोळखी व्यक्तीविषयीची चिंता होय'. अशा प्रकारची चिंता ही जन्मानंतरच्या सहा महिन्यानंतर (म्हणजेच पहिल्या वर्षाच्या दुसऱ्या टप्प्यात निर्माण होते.

अनोळखी व्यक्ती प्रतिची चिंता का निर्माण होते? इथे देखील मुलांमधील वाढलेली बोधनिक क्षमता आणि मेंदूचा विकास याची भूमिका महत्वपूर्ण ठरते. शिशुंच्या स्मृतीचा जसजसा विकास होतो तसतसे ते आपण ओळखत असणारे व ओळखत नसणारे अशा दोन्ही व्यक्तींमध्ये भेद करावयास शिकतात. बोधनिक क्षमतांमधील प्रगतीमुळे परिचित व्यक्तींप्रती अतिशय सकारात्मक

Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

पद्धतीने प्रतिक्रिया करण्याची तसेच अपरिचित व्यक्तींना ओळखण्याची क्षमता त्यांना प्राप्त होते. याचबरोबर सहा ते नऊ महिन्यांदरम्यान शिशु आपल्या सभोवतालच्या जिवांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करतात. त्यानंतर भविष्यकथन आणि अपेक्षा करण्याचा प्रयत्न करतात. जेव्हा काही अनपेक्षित घडते जसे अनोळखी व्यक्ती समोर येते, तेव्हा ते भीतीची भावना अनुभवतात.

अनोळख्या व्यक्तीप्रतीची चिंता ही सहा महिन्यांनंतर सार्वत्रिक असते तथापि यामध्ये मुलांमुलांमध्ये भेद आढळतो. काही मुले विशेषतः ज्यांना अनोळखी व्यक्ती विषयीचा अधिक अनुभव आहे ती मुले कमी प्रमाणात चिंता व्यक्त करतात. तुलनेने ज्यांना अनोळख्या व्यक्तीचा मर्यादित अनुभव आहे अशी मुले अधिक चिंताग्रस्त होतात. सर्वच अपरिचित सारखी च चिंता निर्माण करतात असे नाही तर पुरुष अपरिचितांच्या तुलनेत स्त्री अपरिचितांप्रती कमी चिंता निर्माण होते. याचबरोबर अपरिचित व्यक्ती जर लहान मूल असेल तर शिशु त्यांच्याप्रती अधिक सकारात्मक दृष्ट्या प्रतिक्रिया करतात.

जेव्हा काळजी घेणाऱ्या व्यक्ती पासून शिशु दुरावतात तेव्हा त्यांच्यामध्ये वियोगात्मक चिंता निर्माण होते. वियोगात्मक (विभक्त) चिंता ही संस्कृतीदरम्यान वैश्विक असल्याचे दिसून येते या चिंतेची सुरुवात सात किंवा आठ महिन्यांनंतर होते जी चौदाव्या महिन्यापर्यंत उच्च पातळीवर राहते व त्यानंतर यामध्ये घट निर्माण होते. ज्या कारणांमुळे अनोळख्या व्यक्तीविषयीची चिंता निर्माण होते त्याच कारणांमध्ये वियोगात्मक चिंतेची कारणे आरोपित करता येतात. शिशुच्या वाढत्या बोधनिक कौशल्यामुळे त्यांच्यामध्ये काही प्रश्नांची निर्मिती होते तथापि या प्रश्नांची उत्तरे समजून घेण्याच्या दृष्टीने ती खूपच लहान असतात. आपली आई आपणास का सोडून जात आहे? ती कुठे जात आहे? ती पुन्हा येईल का? असे अनेक प्रश्न त्यांच्यामध्ये चिंता निर्माण करतात.

अनोळखी व्यक्तीप्रतीची चिंता आणि वियोगात्मक (विभक्त) चिंता ही सामाजिक प्रगती मध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. यामुळे बोधनिक प्राथमिक काळजी घेणाऱ्या व्यक्ती व शिशु यांच्यामध्ये भावनिक व सामाजिक बंध विकसित होतात. हे बंध सामाजिक नातेसंबंधांच्या पायाभरणीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात.

c) Social Referencing : Feeling what other feel. सामाजिक संदर्भ : इतरांना काय वाटते याची कल्पना करणे : तेवीस महिन्यांची प्रियांका तिच्या मोठ्या भाऊ व त्याचा मित्र एडमेकांशी मोठ्याने वाद करताना तसेच कुस्ती करताना पहाते. काय घडतय याविषयी ती अनभिज्ञ आहे. याविषयीची अनिश्चितता तिच्यामध्ये आहे. ती तिच्या आईकडे पहाते. तिच्या आईस ती मुले खेळत आहेत हे माहिती असल्याने ती या सर्व गोष्टींकडे पाहून हसत आहे. आईची प्रतिक्रिया पाहून प्रियांका सुद्धा हसत आहे जणू काय ती आईच्या चेहऱ्यावरील हावभावांची नक्कल करीत आहे.

प्रियांका प्रमाणेच अनेक विध परिस्थितीमध्ये आपण अनिश्चित असतो. अशावेळी आपण इतर व्यक्ती या सर्व परिस्थितीस कशा प्रतिक्रिया देत आहेत हे पहातो. इतरांवरील हे अवलंबून राहणे यालाच सामाजिक संदर्भ म्हणून ओळखले जाते. सामाजिक संदर्भामुळे कोणती प्रतिक्रिया ही सर्वाधिक योग्य असू शकेल हे ठरविण्यास मदत मिळते.

Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

'अनिश्चित परिस्थिती अथवा घटना स्पष्ट करण्याकरिता याविषयी इतरांना काय वाटते याविषयीच्या माहितीचा हेतूपूर्वक शोध घेण्याची प्रक्रिया म्हणजे सामाजिक संदर्भ होय.' प्रियांकाप्रमाणेच आपण सामाजिक संदर्भाचा आधार घेवून परिस्थितीचा अर्थ लावतो व जे घडते आहे याविषयीची अनिश्चितता अथवा अस्पष्टता कमी करण्याचा प्रयत्न करतो.

वयाच्या आठ किंवा नऊ महिन्याच्या जवळपास पहिल्यांदा सामाजिक संदर्भ अस्तित्वात येतो. सामाजिक संदर्भ ही एक कल्पिमत्तेच्या निर्मितीशी होणारी सामाजिक क्षमता आहे. शिशूंना इतरांच्या चेहऱ्यावरील हावभावांच्या सूचकांच्या रूपात वापर करून फक्त त्यांच्याविषयी, वर्तनाविषयी समजून घ्यायचे नसते तर याबरोबर एखाद्या विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भात त्यांच्या वर्तनाचा अर्थ देखील समजून घ्यायचा असतो.

सामाजिक संदर्भामध्ये शिशु चेहऱ्यावरील हावभावाचा विशेष वापर करतात. उदा: एका अभ्यासामध्ये शिशूंना खेळण्याकरिता नेहमीपेक्षा वेगळे असे विलक्षण खेळणे खेळण्यास दिले. ते त्याच्याशी किती वेळ खेळणार हे त्यांच्या आईच्या चेहऱ्यावरील हावभावाशी निगडीत असल्याचे दिसून आले. जेव्हा त्यांच्या आईने खेळण्याप्रती तिरस्कार अथवा किळस ही भावना प्रदर्शित केली तेव्हा शिशु त्या खेळण्याशी कमी वेळेकरिता खेळले. यांउलट त्यांच्या आईने खेळण्याप्रती आनंदी भाव व्यक्त केले तेव्हा शिशु त्या खेळण्याशी अधिक वेळ खेळले. याउलट याच खेळण्यासोबत त्या शिशूंना पुन्हा खेळण्याची संधी दिली असता आईच्या चेहऱ्यावरील तटस्थ हावभावाच्या परिणामस्वरूपी ते शिशु खेळण्यासोबत खेळण्यास नाखूष दिसले. याचाच अर्थ पालकांच्या अभिवृत्तीचा दीर्घकाल प्रभाव पडतो.

(I) Two explanations of social referencing: सामाजिक संदर्भाची दोन स्पष्टीकरणे: जीवनाच्या अथवा आयुष्याच्या प्राथमिक अवस्थेत सामाजिक संदर्भाची सुरुवात होते हे जरी स्पष्ट असले तरी देखील ही प्रक्रिया कशी कार्यान्वित होते याविषयी स्पष्टता नाही. कदाचित इतरांच्या चेहऱ्यावरील हावभावाचे निरीक्षणातून ते प्रकट करीत असणाऱ्या हावभावापाठीमागील भावनांची निर्मिती होत असेल. जसे एखादी व्यक्ती दुःखी असल्याचे जेव्हा शिशु पहातो तेव्हा त्यालाही दुःखजाणवते परिणामी त्याचे वर्तन प्रभावित होते. याउलट एखाद्याचे हावभाव हे फक्त माहिती प्रकट करीत असतील तेव्हा शिशूंना एखाद्या विशिष्ट अशा भावनांची अनुभूती होत नाही. ती प्रदर्शित हावभावाचा वापर आपल्या वर्तनास दिशा देण्याकरिता करतो.

वरील दोन्ही स्पष्टीकरणांना संशोधनाचा आधार आहे. परिणामी दोन्हीपैकी कोणते स्पष्टीकरण योग्य आहे हे सांगता येणार नाही. परिस्थिती जेव्हा अस्पष्ट, संदिग्ध असते तेव्हा सामाजिक संदर्भ अस्तित्वात येते एवढे मात्र नक्की. शिशुना जेव्हा भावनिक संदेशासोबत संघर्षमय स्थिती निर्माण होते तेव्हा शिशु नाराज होतात. उदा: एखाद्या पुठ्याच्या खोक्याला लाथ मारल्याचे पाहून तिची आई रागावलेली आहे हे शिशु पहातो, याउलट त्याच्या याच कृतीचे आजोबास कौतुक वाटते व याविषयी हसून आनंद व्यक्त करते. इथे या शिशुला दोन परस्परविरोधी संदेश प्राप्त होतात. असे संमिश्र संदेश शिशुमध्येही तणावाचे खरे लक्षण असतात.

Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

(II) Decoding other's facial and vocal expressions: इतरांच्या चेहऱ्यावरील व मौखिक हावभावांचे विसंकेतीकरण : सामाजिक संदर्भाच्या वापराची क्षमता ही सामाजिक सूचकांचा उलगडा करण्याच्या, सामाजिक वर्तन समजून घेण्याच्या क्षमतेवर अवलंबून आहे. या क्षमतांचा वापर करून शिशु इतरांच्या चेहऱ्यावरील व मौखिक हावभाव यांचा अर्थ लावतात.

मौखिक हावभावामधील भेदाच्या संवेदनाची सुरुवात शिशूंमध्ये चेहऱ्यावरील हावभावाच्या भेदाच्या संवेदनाच्या आधी होते. आनंदी व दुःखी मौखिक संदेशामध्ये भेद करण्याची क्षमता शिशुमध्ये पाचव्या महिन्यापासून निर्माण होते.

चेहऱ्यावरील सामाजिक सूचकांच्या विसंकेतीकरणाच्या क्षमतेमधील प्रगतीच्या क्रमाविषयी संशोधकांना बरीच माहिती आहे. पहिल्या सहा ते आठ आठवड्यांमध्ये शिशुचे दृश्य संवेदनातील अचूकपणा हा मर्यादित असतो. परिणामी ते इतरांच्या चेहऱ्यावरील हावभावाप्रती अधिक अवधान देऊ शकत नाहीत. तथापि भावनांच्या विभिन्न अभिव्यक्तींमध्ये भेद करण्यास ते लवकरच शिकतात. चेहऱ्यावरून व्यक्त होणाऱ्या भावनांच्या तीव्रतेमधील भेदानुसार प्रतिक्रिया करण्यास सक्षम होतात. असामान्य अथवा विलक्षण अशा चेहऱ्यावरील हावभावास देखील ते प्रतिक्रिया देतात. उदा! शिशु आपल्या आईकडून प्रदर्शित होणाऱ्या तटस्थ हावभाव, अप्रतिक्रियाशील हावभावाप्रती तणावाच्या अथवा दुःखाच्या प्रतिक्रिया देतात.

पहिल्या वर्षाच्या मध्यावर इतरांच्या मौखिक आणि चेहऱ्यावरील हावभावापाठीमागील खोटेपणा समजून घेण्यास शिशु शिकतात. यासंदर्भातील एका प्रयोगामध्ये सात महिन्याच्या शिशुस आनंद आणि दुःख यांविषयीचे चेहऱ्यावरील हावभावासोबत आनंद व्यक्त करणारा आवाज तसेच दुःख व्यक्त करणारा आवाज सादर केला असता जेव्हा चेहऱ्यावरील हावभाव आवाजाशी जुळले तेव्हा शिशुंनी अधिक अवधान दिले. याचा अर्थ चेहऱ्यावरील हावभावापाठीमागील भावनांचे संवेदन त्या शिशुंना होत होते.

एकंदरीत भावनांची निर्मिती आणि अर्थ लावणे या दोन्ही गोष्टी शिशु लवकर शिकतात. आपल्या भावनांचा इतरांवर काय परिणाम होतो हेही ते शिकतात. या क्षमतांमुळेच स्वतःच्या भावना समजून घेणे, इतरांच्या भावना समजून घेणे तसेच परिस्थितीमधील असामान्य संदिग्धता समजून घेणे शक्य होते.

2.2 Intellectual Development बौद्धिक विकास :

बालवाडीतून घरी परतल्यावर जेव्हा सचिन आपल्या आईवडिलांना आकाश निळे का दिसते हे सांगताना पाहून त्याचे आईवडिल आनंदित झाले. त्याचे शब्दोच्चार जरी अचूक नसले तरीदेखील तो पृथ्वीच्या वातावरणाविषयी जे काही सांगत होता ते पाहून आईवडिलांना समाधान वाटत होते. सात वर्षांनंतर सचिन आता अकरा वर्षांचा आहे. सध्या तो त्याच्या बेरीज, वजाबाकीचा गृहपाठ संपवून भारतीय संविधान विषयाचा प्रकल्प पूर्ण करीत आहे.

महत्त्वाचा कालावधीमध्ये विस्तृत / प्रचंड बौद्धिक विकास होऊ घातलेला सचिन हा एकटाच मुलगा नाही. या अवस्थेदरम्यान मुलांच्या बोधनिक क्षमता, कुशलता यांमध्ये वाढ होतात व

अतिशय संकुचित कौशल्ये आत्मसात करण्यास ही मुले सक्षम होत राहतात. तथापी या अवस्थेत त्यांची विचारसरणी प्रौढांसारखी पूर्णतः विकसित झालेली नसते.

बाल्यावस्थेदरम्यान विचारांच्या मर्यादा अथवा प्रगती कोणत्या असतात? मध्य बाल्यावस्थे दरम्यान बोधात्मिक प्रगतीत काय घडत आहे याविषयी अनेक दृष्टिकोन स्पष्टीकरण पुरवितात.

Ⓐ Piagetian Approaches to Cognitive Development: बोधात्मिक विकासा विषयीचा पियाजे यांचा दृष्टिकोन:

पियाजे यांच्या मते, पूर्वशालेय अवस्थेतील मुले कृतिपूर्व पद्धतीने विचार करतात. या प्रकारचे विचार हे अधिकांशपणे आत्मकेंद्रित (Egocentric) असतात. कृतिपूर्व अवस्थेमधील मुलांमध्ये संघटित, औपचारिक, तार्किक मानसिक प्रक्रिया यासारख्या कृतींच्या वापराविषयीची अक्षमता दिसते.

① The rise of concrete operational thought: मुर्त क्रियात्मक विचारांचा उदय:

मुर्त क्रियात्मक/ठोस कृतियुक्त विचारांची अवस्थेची सुरुवात वयाच्या सात ते बारा (7 to 12) वर्षांदरम्यान होते. या अवस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे सक्रियता, तर्काचा वापर आणि योग्य विचार होय. समस्येविषयीच्या समाधानाकरिता तार्किक कार्यप्रणालीच्या वापरांचा अंतर्भाव ठोस कृति विचारांमध्ये होतो. उदा: ठोस कृति अवस्थेमधील मुले ही संवर्धनाच्या (conservation) समस्येस सामोरी जातात. जसे एका भांड्यातून दुसऱ्या आकाराच्या भांड्यात समान आकारमानाचे द्रव्य ओतल्यास त्याचे आकारमान सारखे राहते की त्यात बदल होतो. याचे उत्तर देण्याकरिता ते बोधात्मिक तसेच तार्किक प्रक्रियेचा वापर करतात. बाह्य रूपाचा आकाराचा फारसा प्रभाव इथे होताना दिसत नाही. भांड्यामधील द्रावण कोणत्याही स्थितीमध्ये वाया गेलेले नाही परिणामी दोन्ही भांड्यामधील द्रावण सारखे च असल्याचे सांगतात. ही मुले कमी आत्मकेंद्रित असतात परिणामी परिस्थितीचे विविध अंगी मूल्यमापन करु शकतात. या क्षमतेस विकेंद्रीकरण (Decentering) असे म्हटले जाते. या अवस्थेमधील मुले घटनांचे स्पष्टीकरण करण्याकरिता याच क्षमतेचा वापर करतात.

कृतिपूर्व विचारातून ठोस कृति अवस्थेकडे होणारे स्थलांतर एका रात्रीत घडत नाही. ठोस कृतिविचार अवस्थेकडे मार्गक्रमणा करण्याच्या दोन वर्षांपूर्वी ही मुले कृतिपूर्व व ठोस कृति विचारांबाबत मध्ये पुढे होत असतात. उदा: वर सांगितलेल्या द्रव पदार्थांच्या संवर्धनाच्या समस्ये मध्ये त्या प्रश्नाचे ते अचूक उत्तर देतात तथापि हे असे का याविषयी त्यांना स्पष्टपणे सांगता येत नाही. यापाठीमागचे स्पष्टीकरण देण्यात मात्र ही मुले अपयशी ठरतात.

जेव्हा ठोस कृतियुक्त विचार पूर्णतः सक्रिय होतात तेव्हा मुलांमध्ये अनेक बोधात्मिक प्रगती दिसून येतात. उदा: मुलांमध्ये Reversibility उलटा/उलटपद्धती विचारांची क्षमता प्राप्त होते. Reversibility म्हणजेच 'उलटापालट' ही अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये रुपांतरीत केल्या जाणाऱ्या उद्दीपकाचे त्याच्या विरुद्ध स्थितीत रुपांतरण केले जाते. उलटापालटच्या क्षमता आत्मसात केल्यानेच कळते की अथवा मातीचा गोळ्यापासून दोरीसारखा लांब दोर करता येतो जो पुन्हा त्याच्या मूळ रुपात म्हणजेच गोलाकार आकारात येऊ शकतो हे मुले शिकतात. गणित अमूर्तपणे पाहिल्यास ज्याप्रमाणे 3+5=8 त्याचप्रमाणे 5+3=8 येतो याची देखील जाणीव

मुलांना होते. यापुढे जाऊन ८-३=५ हे ही मुलांना अवगत होते.

ठोस कृतियुक्त विचारांमुळे मुलांना वेळ आणि जागी यामधील नातेसंबंधाविषयी आकलन होते. या अवस्थेत प्रवेश केलेली मुले गाडी एखाद्या जागेने पळण्यासाठी लागणारे कारण स्पष्ट करू शकतात. तथापी ८ ते १० वयोगटातील मुले ही एखादी गाडी दीर्घ पल्ल्याच्या रस्त्याने येऊन सुद्धा लघु पल्ल्यावरून (लवकर) येणाऱ्या गाडीसोबत एकाच ठिकाणावर पोहचत असेल तर ती अधिक जागेने पळाली असल्याचा अचूक निष्कर्ष काढतात.

या अवस्थेची अनेक धनात्मक बाजू असल्या तरीदेखील मुलांच्या विचारांमध्ये एक चिकित्सात्मक अपवाद दिसतो. तो म्हणजे ही मुले भौतिक वस्तूंविषयी ठोस पणे जोडली अथवा बांधली जातात. यापुढे ते पूर्णतः तार्किक, अमूर्त प्रश्नांच्या आकलनात असमर्थ ठरतात.

(II) Piaget in perspective : Piaget was right, Piaget was wrong :

<u>पियाजे यांच्या दृष्टिकोन किती बरोबर किती चूक :</u>

पियाजे यांच्या दृष्टिकोनामध्ये अनेक धनात्मक मुद्दे आहेत त्याप्रमाणे टीका करता येण्याजोग्या मुद्द्यांचाही समावेश करता येईल. लहान मुलांच्या निरीक्षणामध्ये पियाजे हा वाकबगार होते. त्यांच्या अनेक पुस्तकांमध्ये मुलांविषयीचे काळजीपूर्वक निरीक्षणे नोंदविली गेली आहेत. यापलीकडे त्यांच्या सिद्धांताचे शैक्षणिक उपयोजन देखील प्रभावशाली आहे.

पियाजे यांचा दृष्टिकोन मुलांच्या बोधात्मक विकासाचे स्पष्टीकरण करण्याकडे यशस्वी ठरला आहे. तथापी त्यांच्या दृष्टिकोनाविषयी अनेक टीकाकारांनी योग्य तक्रारी नोंदवल्या आहेत. अनेक टीकाकारांच्या मते पियाजे यांनी मुलांच्या क्षमतांचे अवमूल्यन केले आहे. त्यांनी केलेल्या छोट्या मर्यादित प्रयोगामुळे मुलांच्या क्षमतांचे कमी मुल्यांकन केल्याचे दिसते. जेव्हा प्रयोगाची व्याप्ती वाढवली जाते तेव्हा पियाजे यांनी स्पष्ट केलेल्या स्थितीशी मुले कमी प्रमाणात कुशलता दाखवितात.

याशिवाय असे आढळले की, मुलांमध्ये वयाच्या दोनाव्या (त्यामध्ये बोधात्मक क्षमता दिसतात) पासूनच्या पियाजे यांचा अंदाज चुकला असल्याचे अनेकांचे मत आहे. पियाजे यांनी मांडलेल्या वयापूर्वीच मुलांमध्ये बोधात्मक क्षमता विकसित होतात असे टीकाकारांचे मत आहे. काही मुलांमध्ये वयाच्या सातव्या वर्षापूर्वीच ठोस क्रियात्मक विचारांची निर्मिती झाल्याचे दिसून येते. पियाजे यांच्या मते वयाच्या सातव्या वर्षी बोधात्मक क्षमता सर्वप्रथम दिसून येतात.

असे असले तरीदेखील आपण पियाजे यांचा दृष्टिकोन नाकारू शकत नाही. काही आंतरसंस्कृती संशोधने जरी काही संस्कृतीमधील मुले क्रियापूर्व विचारांची अवस्था सोडत नसले, टप्पा गाठण्यात अथवा संवर्धनामध्ये अपयशी ठरत असले आणि ठोस कृतियुक्त विचारांची अवस्था विकसित करण्यात अपयशी ठरत असल्याचा दावा करीत असले तरी देखील सध्याची संशोधने व त्यांचे निष्कर्ष याच्याशी सहमत झालेले असे नाही. उदा: संवर्धनाच्या बाबतीत विचार केल्यास अपाश्चिमात्य संस्कृतीमधील मुलांमध्ये संवर्धनाविषयीची क्षमता दिसते. एका अध्ययनामध्ये ऑस्ट्रेलियन शहरी मुलांनी पियाजे यांनी सांगितलेल्या वेळेमध्येच संवर्धन प्रक्रियेची क्षमता विकसित केली जी ग्रामीण आदिवासी आस्ट्रेलियन मुलांमध्ये वयाच्या चौदाव्या वर्षादेखील आढळून

Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

आला नाही. जेव्हा ग्रामीण आदिवासी मुलांना संवर्धनाचे प्रशिक्षण दिले असता या मुलांनी देखील शहरी मुलांप्रमाणे संवर्धनाची कौशल्ये प्रदर्शित केली.

मुलांच्या स्व संस्कृतीचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या संशोधकाने जेव्हा मुलांच्या मुलाखती घेतल्या तेव्हा मुलांनी ठोस कार्यपुरक विचार प्रदर्शित केले. मध्य बाल्यावस्थेमध्ये मुलांमध्ये ठोस प्रक्रिया संपादित केल्या जातात या पियाजे यांच्या मताला वरील संशोधनातून वाव मिळतो. काही विशिष्ट बोधात्मक समस्यांबाबत काही संस्कृतिमधील मुले पाश्चिमात्य संस्कृतीमधील मुलांच्या तुलनेत पिछाडीस पडतात याचे कारण म्हणजे पियाजे यांच्या संवर्धन आणि ठोस कृती विषयींच्या अनुभवांबाबत त्यांना अनुभवास येणारी भिन्नता होय. याचाच अर्थ मुलांची संस्कृतीचे स्वरूप लक्षात न घेता त्यांचा बोधात्मक विकासाचे मापन करणे अथवा बोधात्मक विकास समजून घेणे शक्य नाही.

(B) Information Processing in middle childhood मध्य बाल्यावस्थेतील माहिती प्रक्रियन :

पहिल्या इयत्तेमधील मुलांना गणितातील मुलभूत कौशल्ये जसे बेरीज व वजाबाकी, सोप्या शब्दांचे शब्दलेखन उदा: कमल, गगन इ. करता येणे ही त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे संपादन असते. हीच मुले जेव्हा सहाव्या इयत्तेत जातात तेव्हा अपूर्णांक व एकांश दशांश स्वरूपाची उदाहरणे सोडविण्यास सक्षम होतात. याचबरोबर जोडाक्षरे, अवघड शब्दलेखन करण्यास शिकतात.

माहिती प्रक्रियन प्रारूपानुसार मुले वयानुसार माहिती हाताळण्यामध्ये अत्याधुनिक होतात. ज्याप्रमाणे संगणकाची प्रक्रियन व स्मृती क्षमता विकासानंतर तो अधिक माहितीची प्रक्रिया करण्यास सक्षम बनतात. त्याप्रमाणे मुलांच्या वाढत्या वयाने माहिती प्रक्रियनाची क्षमता वाढते.

(1) Memory स्मृती : माहितीचे संकेतन, साठवण आणि पुन:प्राप्तणाची क्षमता म्हणजे स्मृती होय. लहान मुलांच्या दृष्टीने एखादी छोटी माहिती लक्षात ठेवायची झाल्यास वरील तीनही टप्प्यांवरील प्रक्रिया सुरळीतपणे पार पडली पाहिजे. संकेतनाच्या माध्यमातून मुले माहितीची नोंद वापरण्या-योग्य स्मृतीच्या रूपात नोंदवतात. 5+6=11 हे ज्या मुलांना शिकवलेच जात नाही अथवा शिकवताना ज्या मुलांनी याकडे लक्ष दिले नाही त्या मुलांना पुढे कधीच याविषयीची माहितीचे पुन:प्राप्तण कधीच करता येत नाही.

तथापि या माहितीप्रती अल्प संपर्क ठेवणे पुरेसे नाही. ही माहिती संकलित करून साठवणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. वरील उदाहरणामधील 5+6=11 ही माहिती स्मृती प्रणालीत साठवली गेली पाहिजे. शेवटी जी माहिती स्मृती मध्ये साठवली आहे ती आठवणे देखील यायला हवी. स्मृतीमध्ये साठवलेली माहिती पुन:प्राप्तण प्रक्रियेद्वारे जाणिवेच्या स्थितीत आणली जाते.

मध्य बाल्यावस्थेदरम्यान लघु-कालिन स्मृती ज्याला कार्यरत स्मृती असेही म्हणतात याची क्षमता लक्षणीयरित्या वाढते. उदा. 1-5-6-3-4 या अंकांची शृंखला ऐकून ती उलट क्रमाने म्हणजेच 4-3-6-5-1 याप्रमाणे म्हणू शकतात. शालेयपूर्व अवस्थेच्या सुरुवातीस ते दोन अंकी संख्या वाचू व उलट क्रमाने सांगू शकतात. किशोरावस्थेच्या सुरुवातीस सहा अंकी संख्येवर प्रक्रिया करण्याशी निगडित कार्य करू शकतात. याचबरोबर माहितीच्या आठवणीकरिता ते अत्याधुनिक तंत्रांचा वापर करतात. प्रशिक्षणाने या क्षमतेमध्ये सुधारणा होते.

बोधात्मक विकासामधील एका महत्त्वाच्या मुद्द्यावर स्मृतीची क्षमता प्रकाश टाकण्याचा

Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

प्रयत्न करते. काही वैकासिक मानसशास्त्रज्ञांच्या मते संवर्धनाच्या समस्या सोडवण्यात अडचणी मुलांमध्ये स्मृतीच्या मर्यादेच्या अक्षमता आढळतात. त्यांच्या मते लहान मुले माहितीचे आवश्यक तुकडे/संदर्भ/माहिती आठवण्यात अक्षम ठरतात परिणामी संवर्धन (लेपानाच्या) अचूक उपाय शोधू शकत नाहीत.

(II) Metamemory आदि/मेटास्मृती : स्मृतीच्या संदर्भातील असणाऱ्या प्रक्रियांचे आकलन म्हणजे मेटास्मृती होय. मेटास्मृती ही मध्य बाल्यावस्थेदरम्यान अस्तित्वात (उदयास) येते व विकास पावते. लहान मुले जेव्हा पहिल्या इयत्तेत जातात तेव्हा त्यांना स्मृती म्हणजे नेमके काय व काही व्यक्ती मध्ये इतरांच्या तुलनेत अधिक स्मृती क्षमता असतात याचे आकलन होते.

शाळेत जाणाऱ्या मुलांमध्ये स्मृती विषयीचे आकलन अधिक समृद्ध होते. त्यांचे वय जसजसे वाढत जाते तसतसे ते नियंत्रणाच्या धोरणांमध्ये अधिक प्रमाणात व्यक्त होतात. नियंत्रणाच्या धोरणांमध्ये बोधावस्था (conscious), बोधात्मक प्रक्रिया सुधारण्याकरिता हेतूपूर्वक तंत्रांच्या वापर यांच्या समावेश होतो. उदा: शालेय वयातील मुलांना उजळणी ... माहितीची पुनरावृत्ती हे स्मृती सुधारण्याकरिता महत्त्वपूर्ण तंत्र आहेत याची जाणीव होते. मध्य बाल्यावस्थेदरम्यान ते या तंत्रांच्या प्रभावीपणे वापर करतात. याप्रमाणे माहितीचे सुसंगत आकृतिबंधामध्ये क्रमशः संघटन करण्याकरिता ... अधिक प्रयत्न करतात. उदा: ताट, चमचे, वाटी, सुरी इत्यादींच्या समावेश असणारी यादी लक्षात ठेवण्याकरिता ही मुले ताट-वाटी, चमचे-सुरी याप्रमाणे सुसंगती प्रदर्शित करणारे घटकांची यादी करतात.

मध्य बाल्यावस्थेमधील मुले स्मृती सुधार तंत्रांचा वापर करतात. स्मृती सुधार तंत्रे ही माहितीचे संघटन करण्याची औपचारिक तंत्रे आहेत ज्यामुळे माहिती अधिक प्रमाणात लक्षात राहते. उदा महिन्याचे दिवस लक्षात ठेवण्याकरिता हाताच्या बोटांवरील उंचवट्याच्या आधारे कोणत्या महिन्यात ३० व कोणत्या महिन्यात ३१ दिवस हे लक्षात ठेवतात.

(III) Improving Memory: स्मृती सुधार : नियंत्रण तंत्रांच्या प्रभावी वापराकरिता मुलांना प्रशिक्षित करता येते का? अर्थातच शालेय वयीन मुलांना निश्चितपणे विशिष्ट तंत्रे वापरण्यास शिकविता येते. उदा: स्मृती सुधार तंत्रांचा वापर कसा करायचा याबरोबरच कधी आणि कुठे याचा प्रभावीपणे वापर करायचा याची माहिती मुलांना व्हायला हवी.

याकरिता Key word strategy मुख्य शब्द तंत्र या नाविन्यपूर्ण तंत्राचे उदाहरण पाहू. यामध्ये परकीय भाषा शब्दसंग्रह वाढविण्याकरिता, राज्यांच्या राजधान्यांची नावे, अथवा इतर महत्त्वपूर्ण माहिती लक्षात ठेवण्याकरिता शब्दांची जोड केली जाते. मुख्य शब्द तंत्रामध्ये एका शब्दांची जोड त्यासारख्या उच्चारल्या जाणाऱ्या शब्दाशी लावली जाते. उदा: परकीय भाषा संपादनामध्ये इंग्रजी शब्द हा मुख्य शब्द मानून इतर भाषेशी जोडला जातो. उदा: बदक (Duck) या इंग्रजी शब्दास Spanish मध्ये Pato म्हणतात उच्चार pot-o असा होतो. इथे pot हा मुख्य किंवा सूचक शब्द म्हणून वापरला जातो व Pato - pot अशी जोड लावली जाते. घोड्याला Spanish मध्ये Caballo म्हणतात उच्चार cob-eye-yo असा होतो इथे eye हा सूचक शब्द आहे. इथे मुळे मानसिक प्रतिमा तयार करतात व शब्द लक्षात ठेवतात.

Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

(c) Vygotsky's approach to cognitive development and classroom instruction

व्यगोट्स्की यांचा बोधात्मिक विकास विषयक दृष्टिकोन आणि शालेय सूचना & अध्ययनास पोषक वातावरणाच्या (परिवेशाच्या) परिणाम सर्जनशी मुलांना अध्ययन विषयक तंत्रे आत्मसात करण्यास प्रोत्साहित करतात. रशियन वैज्ञानिक तज्ञ लेव व्यगोट्स्की यांनी मुलांमध्ये बोधात्मिक प्रगती ही मुलांच्या समिपस्थ विकासाच्या क्षेत्रा दरम्यान माहितीच्या संपर्कामुळे निर्माण होते. समिपस्थ विकास क्षेत्र (zone of proximal development) ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये एखादी कृती करणे अथवा आकलन करणे काही अंशी जमते तर काही अंशी नाही.

व्यगोट्स्की यांचा दृष्टीकोन हा मुले ही त्यांच्या शैक्षणिक अनुभवामध्ये सक्रियपणे सहभागी होतात या विचारावर आधारित असल्याने वर्गामधील अथवा शालेय पद्धती च्या विकासावर विशेषकरुन प्रभावशाली आहे. यामुळे शाळा अथवा वर्ग हा मुलांना नवीन प्रयोग अथवा नवीन कृती करण्यासाठीची संधी प्राप्त करुन देणारे ठिकाण असा त्याला पाहिले जाते.

व्यगोट्स्की यांच्या नुसार शिक्षण हे इतरांसमवेतच्या आंतरक्रिया सम्मिलित असणाऱ्या कार्यांवर लक्ष केंद्रित करणारे असावे. मुले-पालक (प्रौढ) तसेच मुले-मुले अशा दोन्ही प्रकारच्या आंतरक्रिया बोधात्मिक वाढीच्या संभाव्यता पुरवितात. या आंतरक्रियांचे स्वरूप मात्र प्रत्येक मुलांच्या व्यक्तिगत समिपस्थ विकासाच्या स्थितीमध्ये बांधले गेलेले असावे.

सध्या अस्तित्वात असणारे महत्वपूर्ण नाविन्यपूर्ण उपक्रम हे व्यगोट्स्की यांच्या कार्यातून घेतले आहेत. उदा. सहकार्यात्मक अध्ययन (cooperative learning), यामध्ये सामाईक ध्येयाच्या प्राप्तीकरिता मुले एकत्रित रीत्या काम करतात. सहकार्यात्मक समूहामध्ये काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना इतरांकडील अंतर्दृष्टी प्राप्त होते. जर एखादा त्याचा मार्ग चुकला तर इतर समूह सदस्य त्याची चूक सुधारण्याचा मार्ग दाखवतात. यांच्या उलट अध्ययन समूहामधील प्रत्येक समवयस्क हा कितपत मदत करणारा असतोच असे नाही. समूह सदस्यांपैकी एक जरी विद्यार्थी दिलेल्या कार्यामध्ये सक्षम व तज्ञ असल्यास त्याच्या इतर सदस्यांना फायदा होतो.

पारस्परिक अध्यापन (Reciprocal Teaching) ही आणखी एक शैक्षणिक पद्धत आहे ज्यामधून व्यगोट्स्की यांच्या बोधात्मिक विकासाच्या दृष्टिकोन प्रतिबिंबित होतो. पारस्परिक अध्यापन हे एक असे तंत्र आहे ज्यामध्ये वाचन आकलन तंत्रे शिकविली जातात. विद्यार्थ्यांना उताऱ्यामधील आशयाचा कसा स्पर्श करायचा, मध्यवर्ती मुद्द्याबाबत प्रश्न कसा विचारायचा, उताऱ्याचा सारांश, व शेवटी पुढे काय होणार याविषयी भविष्यकथन करणे हे शिकवले जाते. या तंत्रांचे महत्व हे त्याच्या पारस्परिक स्वरूपामध्ये आहे. हे तंत्र विद्यार्थ्यांना शिक्षकाची भूमिका पार पाडण्याची संधी देते. सुरुवातीस शिक्षक विद्यार्थ्यांना आकलनाच्या तंत्रांने सुरुवात करतात. हळूहळू विद्यार्थी त्यांच्या समिपस्थ विकासाच्या स्थितीमध्ये प्रगती करायला लागतात. परिणामी तंत्राचा वापरावर अधिकाधिक नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करतात जोवर ते अध्यापकाची भूमिका स्विकारत नाहीत. वाचन आकलनाच्या पातळीमध्ये वाढ करण्यामध्ये ही पद्धती अतिशय प्रभावी ठरते विशेषतः ज्या मुलांना वाचनाविषयीच्या अडचणी असतात अशा मुलांकरिता सदर तंत्र अतिशय प्रभावी ठरते.

Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

2.3 The Developing self विकसनशील स्व :

वयाच्या नवव्या वर्षी रितु इयत्ता तिसरी मध्ये प्रवेश करते. उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये ती तिच्या बाहुलीसाठी घर बनवत असते. संपूर्ण सुट्टी ती या कामात व्यस्त आहे. आता सुट्टी संपत आली आहे त्याचप्रमाणे तीचे घर सुद्धा जवळपास पूर्ण झाले आहे. या कार्या दरम्यान आता तिच्या बाहुलीचे स्वतःचे घर असेल याचा तिला अभिमान वाटतो.

वरील उताऱ्यामधून रितु मधील वाढत जाणारी सक्षमता प्रतिबिंबित होते. एरिक एरिक्सन याने याला उद्योगशीलता असे म्हटले तसेच उद्योगशिलता रितुच्या कार्यातून व्यक्त होते.

(A) Psychosocial development in middle childhood मध्य बाल्यावस्थेमधील मनोसामाजिक विकास :

एरिक एरिक्सन यांच्या मते साधारणपणे वयाच्या 6 ते 12 वर्षादरम्यान उद्यमशिलता विरुद्ध न्यूनत्वभाव ही स्थिती अथवा संघर्ष निर्माण होतो. या स्थितीमध्ये पालक, समवयस्क, शाळा व इतर बाह्य विश्वामधील गुंतागुंतीमधून निर्माण होणारी आव्हानांच्या पूर्ती करण्यामधून उद्यमशिलता विरुद्ध कमीपणा (न्यूनत्व) ही स्थिती उद्भवते.

मध्य बाल्यावस्थे दरम्यान मुलं जसजशी वाढत जातात तसतसे शाळांमधून अनेक आव्हाने निर्माण व्हायला लागतात. शाळांमध्ये त्यांना काय सादर करायचे फक्त यावर त्यांना कौशल्य प्राप्त करावे लागते असे नाही तर त्यांना त्यांच्या सामाजिक विश्वामध्ये स्वतःचे स्थान निर्माण करावे लागते. समूह कार्यांमध्ये मुले इतरांसमवेत कृती करायला लागतात. परिणामी विभिन्न सामाजिक समूह आणि भूमिका मधून त्यांना मार्गक्रमण करावे लागते.

उद्यमशिलता विरुद्ध न्यूनत्व या अवस्थेमधील यश हे मुलांमध्ये प्राविण्याची भावना विकसित करते. सक्षमता, नैपुण्य वाढीस लागते. याउलट या अवस्थेमधील अपयश हे अपुरेपणाची अपयशाची भावना वाढीस लावते. परिणामी मुले स्वतःला शैक्षणिक कार्यक्रमांपासून स्वतःहून अलग करतात. अध्ययनामध्ये, कृतींमध्ये कमी आवड दर्शवी प्रदर्शित करतात, नवीन काही तरी करण्याची अथवा नवी वाटचालीच्या प्रेरणेचा अभाव, समवयस्कांशी आंतरक्रिया न करणे इत्यादी बाबी मुलांमध्ये निर्माण होतात.

उद्यमशिलता (परिश्रमशीलता) च्या प्राप्तीचे दूरगामी परिणाम असल्याचे मुलांच्या लक्षात येते. उदा. एका अध्ययनामध्ये मध्य बाल्यावस्थेमधील परिश्रमशीलतेचा प्रौढावस्थेमध्ये काय प्रभाव पडतो याविषयी 450 पुरुषांचा जवळपास 35 वर्ष अभ्यास केला असता असे दिसून आले की जे प्रौढ त्यांच्या बाल्यावस्थेत परिश्रमी आणि उद्योगशील होते ते प्रौढपणी यशस्वी असल्याचे दिसून आले. त्यांचे व्यावसायिक आणि व्यक्तिगत जीवन ही दोन्ही क्षेत्रे यशस्वी व समृद्ध होते. बुद्धिमत्ता आणि कौटुंबिक पार्श्वभूमी यापेक्षा इतर प्रौढांच्या यशस्वितेमध्ये बाल्यावस्थेमधील परिश्रमशीलता ही अधिक जवळून संबंधित असल्याचे दिसून येते.

(I) Understanding One's self स्व आकलन :

मी कोण आहे? या प्रश्नाचे उत्तर देण्याचा मुलांचा प्रयत्न मध्य बाल्यावस्थेदरम्यान सुरूच राहतो. या प्रश्नाचे तात्काळ उत्तर शोधण्याची

Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

गरज नसली तरी देखील पुढील आयुष्यामध्ये याची भूमिका महत्वपूर्ण असते.

(ड) The shift in Self-understanding from physical to the Psychological:

स्व: आकलनातील बदल: शारीरिक कडून मानसशास्त्रीय: मध्य बाल्यावस्थेदरम्यान मुले स्व:आकलनाचा शोध घेत असतात. बोधात्मक प्रगतीच्या परिणाम स्वरूपी मुले स्वतःला बाह्य आणि शारीरिक आकृतिबंधाच्या रूपात कमी व मानसशास्त्रीय गुणवैशिष्ट्यांच्या रूपात अधिक प्रमाणात पाहतात.

उदा: सहा वर्षांचा शौर्य स्वतःला जलद गतीने धावणारा व उत्तम रेखाचित्र काढणाऱ्याच्या स्वरूपात स्वतःला पाहतो. वरील दोन्ही कौशल्ये ही त्याच्या कारक कौशल्ये म्हणजेच बाह्य कृती अथवा शारीरिक घटकांवर अवलंबून असतात. या उलट ११ वर्षांचा मधुकर स्वतःला देखणा, मैत्रीपूर्ण तसेच मित्रांना मदत करणाऱ्या रूपात पाहतो. इथे त्यांचा दृष्टिकोन हा अमूर्त, आंतरिक तसेच मानसशास्त्रीय गुणवैशिष्ट्यांवर आधारित असतो. स्व: संकल्पनेच्या निर्धारणाकरिता आंतरिक वैशिष्ट्यांचा वापर हा वाढत्या बोधात्मक कौशल्याचा परिपाक असतो.

बाह्य गुणवैशिष्ट्यांकडूनचे लक्ष आंतरिक मानसिक गुणांकडे वेधत असताना आपण कोण आहोत याविषयीचा मुलांचा दृष्टिकोन हा अधिक साध्याकडून अधिक संकीर्ण होतो. मुले आपली मेहनत कशी यशस्वी होईल यासाठी प्रयत्नशील असतात असे एरिकसनला वाटते. मुले जसजशी वाढत जातात तसतसे आपण कोणत्या गोष्टींमध्ये सहज उमगतात व कोणत्या नाही याची त्यांना जाणीव होते. उदा. दहा वर्षांची प्रभा हिला आपण गणितामध्ये प्राविण्य प्राप्त आहोत परंतु तुलनेने शारीरिक क्षमतेत ती तितकी कुशल नाहीस. अकरा वर्षांचा अमेयला मात्र तो जितक्या कौशल्याने क्रिकेट खेळू शकतो तितक्या कौशल्याने त्यास सॉकरबॉल खेळता येत नाही हे कळते.

मुलांची स्व: संकल्पना व्यक्तिगत (Personal) आणि शैक्षणिक (academic) अशा दोन क्षेत्रामध्ये विभागली जाते. मुले स्वतःचे मूल्यमापन चार प्रमुख क्षेत्रांमध्ये करते. तसेच या चारही क्षेत्रांची पुढे उपविभागणी होते. उदा: मुलांच्या अशैक्षणिक स्व: संकल्पनेमध्ये शारीरिक दिसणे, समवयस्क नातेसंबंध, आणि शारीरिक क्षमता या घटकांचा समावेश होतो. यासप्रकारे शैक्षणिक स्व:संकल्पना सुद्धा विभाजित होते. अशैक्षणिक, इंग्रजी आणि गणित या विषयांबाबतची स्व संकल्पने वरील संशोधनाअंती असे दिसून आले की भिन्न भिन्न स्व संकल्पना ह्या एकमेक प्रत्येक वेळी एकमेकांशी निगडित असतातच असे नाही. जसे की गणितामध्ये उत्तम क्षमता असणारे मुल इंग्रजी वाचनात तशीच क्षमता धारण करणारे असेल असे नाही.

(इ) Social comparison सामाजिक तुलना: जर का तुम्हाला कोणी तुम्ही गणिताच्या क्षमतेबाबत कसे आहात असे विचारल्यास तुम्ही या प्रश्नास कसे उत्तर द्याल. अधिकतर जण आपले निष्पादन हे आपल्या वर्गाच्या, शैक्षणिक पातळीच्या व्यक्तींशी तुलना करतात. इथे आपण आपली प्रतिक्रिया ही एखाद्या प्रसिद्ध गणितज्ञाशी तुलना करून व्यक्त करत नाही.

प्राथमिक शालेय वयातील मुले जेव्हा आपण किती सक्षम आहोत या विषयाच्या आकलना करिता याच प्रकारचे तर्क वापरतात. जेव्हा ते लहान असतात तेव्हा आपले चांगले आहोत की वाईट हे निर्धारित करण्याकरिता काही गृहित कल्पनांचा वापर करतात. याकरिता ते सामाजिक तुलनेचा

Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

वापर करतात.

स्वतःच्या क्षमता, वर्तन, नैपुण्य, कौशल्य आणि मताचे मूल्यमापन करताना त्याचे इतरांशी तुलना करण्याची इच्छा म्हणजे सामाजिक तुलना होय. Leon Festinger फेस्टींजर या मानसशास्त्रज्ञांच्या सिद्धांतानुसार जेव्हा क्षमतांचे मापन करण्याकरिता ठोस अथवा वस्तुनिष्ठ मापने उपलब्ध नसतात तेव्हा व्यक्ती सामाजिक वास्तवात (Social Reality) कडे वळते. 'इतर व्यक्ती विश्वाचे संवेदन कसे करतात, वर्तन, विचार आणि भावना अनुभवतात यातून प्राप्त माहितीचे आकलन म्हणजे सामाजिक वास्तव होय.'

तथापी सर्वात यथार्थ तुलना कोण पुरवते? जेव्हा मुलांना अधिक वस्तुनिष्ठपणे त्यांच्या क्षमतांचे मापन करता येत नाही तेव्हा आपल्या सारखे असणाऱ्या व्यक्तींकडे पाहिले जाते.

(क) Downward Social Comparision

अधोगामी सामाजिक तुलना : जरी मुले आपल्या सारख्या व्यक्तींसोबत तुलना करीत असली तरी देखील काही आकस्मित विशेषतः जेव्हा स्व:आदर लक्ष्य त्यांनी असतो तेव्हा मात्र मुले अधोगामी सामाजिक तुलनेचा वापर करतात. आपल्यापेक्षा कमी सक्षम अथवा यशस्वी असणाऱ्या व्यक्तींसमवेत स्वतःची तुलना करणे म्हणजे अधोगामी सामाजिक तुलना होय. अशी तुलना मुलांच्या स्व: आदराचे रक्षण करण्यास मदत करते. आपल्यापेक्षा कमी असणाऱ्या मुलांशी तुलना केल्याने स्वतःचे सर्वोच्च स्थान साध्य करतात. परिणामी ते स्वतःची यशस्वी अशी प्रतिमा निर्माण करतात.

प्राथमिक शाळेतील निम्न संपादन असणारी मुलामध्ये तीव्र अथवा उच्च स्व संकल्पना दिसून येते याचे स्पष्टीकरण अधोगामी सामाजिक तुलनेद्वारे देता येणे शक्य होते. शैक्षणिक संपादनाबाबत ज्यांना फार चांगले करीत नाही असे पाहून त्या मुलांसोबत स्वतःची तुलना केली जाते. याउलट उच्च संपादन असणाऱ्या मुलांसमवेत स्वतःची तुलना केल्यास स्व:आदर मात्र बाधित होण्याची शक्यता असते. थोडक्यात काय जेव्हा स्व: आदराचा संबंध येतो तेव्हा मात्र छोट्या तळ्यात मोठा मासा असणे हे मोठ्या तळ्यात छोटा मासा असण्यापेक्षा कधीही चांगले.

(B) Self- Esteem : Developing a positive or negative view of the self.

<u>स्व आदर : स्वतःविषयीचा धनात्मक किंवा ऋणात्मक दृष्टिच्या विकास :—</u>

मुले स्वतःला शारिरिक आणि मानसिक गुणविशेषांच्या रूपात अनिच्छेने पाहतात नाहीत तर ते विशिष्ट पद्धत स्वतःविषयीचे चांगले अथवा वाईटाच्या रूपात निर्णय घेत असतात. 'व्यक्तीचे .... (स्वतः) विषयीचे एकूणात्य आणि विशिष्ट असे धनात्मक आणि ऋणात्मक स्व: मूल्यमापन म्हणजे स्व: आदर होय.' तर 'स्व: संकल्पनेमध्ये स्व विषयीच्या श्रद्धा आणि बोधांचे प्रतिबिंब पहावयास मिळते.' स्व: आदर हा भावनिक दृष्ट्या अधिक प्रेरित असतो.

मध्य बाल्यावस्थे दरम्यान स्व आदर हा अनेक मार्गांनी विकसित होतो. मुले नेहमीच स्वतःची तुलना इतरांशी करीत असल्याने ते जे काही करतात ते सामाजिक मानदंडानुसार आहे की नाही याचे ते मूल्यमापन करतात. या दरम्यान स्व संकल्पना आणि स्व आदर या दोन्हीमध्ये लक्षणीय भेद निर्माण होतात. वयाच्या सातव्या वर्षी अधिकतर मुलांमध्ये स्वतःविषयीचा वैश्विक तसेच सर्वसाधारण स्व आदर प्रदर्शित होतो. जर का त्यांचा स्व आदर धनात्मक असेल

Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

तर ते अनेक कृती चांगल्या पद्धतीने करू शकतात यावर त्यांचा विश्वास असतो. याउलट त्यांचे स्व आदर नकारात्मक असेल तर आपण अनेक बाबतीत अपुरे आहोत अशी त्यांची धारणा असते.

मध्य बाल्यावस्थेदरम्यान मुलं जसजशी विकसित होत जातात तसतसे काही क्षेत्रांबाबत त्यांचा स्व आदर हा उच्च तर काहींबाबत निम्न पद्धतीने विकसित होतो. उदा: एखाद्या मुलास कलात्मक क्षेत्राविषयी धनात्मक तर मैदानी खेळाबाबत नकारात्मक स्व आदर वाटसि लागतो.

(I) Change and stability in self-esteem: स्व-आदरामध्ये बदल आणि स्थिरता: साधारणपणे मध्य बाल्यावस्था दरम्यान सर्वसाधारणपणे स्व-आदर हा उच्च असतो परंतु वयाच्या बाराव्या वर्षाच्या आसपास त्यामध्ये घट होते. यापाठीमागे अनेक कारणे आहेत तथापी या वयादरम्यान घडणारी सर्वसाधारण घटना म्हणजे शालेय संक्रमण हे यापाठीचे एक प्रमुख कारण आहे. मुले प्राथमिक शाळेतून बाहेर पडून एकतर माध्यमिक शाळा अथवा कनिष्ठ माध्यमिक शाळेमध्ये प्रवेश करतात. या दरम्यान त्यांच्या स्व-आदरामध्ये घट होते- ज्यामध्ये नंतर हळुवारपणे वाढ होते.

या उलट काही मुलांमध्ये दीर्घकालिन स्व-आदर पहावयास मिळतो. अशा मुलांना अधिक खडतर मार्गाचा सामना करावा लागतो. अपयशाच्या चक्रामुळे मुलांमध्ये चिडचिड निर्माण होते. निम्न स्व-आदरामुळे एखाद्या मुलास आपण परीक्षेत चांगली कामगिरी करू शकणार नाही असे वाटते. परिणामी तो अधिक चिंतित होतो त्यामुळे त्या लक्ष केंद्रित करू शकत नाही की अभ्यास करू शकत नाही. असेही आपण परीक्षेत चांगली कामगिरी करू शकणार नाही त्यामुळे अभ्यास करून तरी काय होणार त्यामुळे तो अभ्यासाचेही टडपण घेत नाही. शेवटी व्हायचे तेच होते परीक्षेतील अपयश त्याचा निम्न स्व-आदर अधिक दृढ करतो.

याउलट उच्च स्व-आदर असणारी मुले अधिक धनात्मक मार्ग अवलंबितात. या मुलांमध्ये यशाचे चक्र निर्माण होते. उच्च अपेक्षा अधिकच्या प्रयत्नांना व निम्न चिंतेस जन्म देतात परिणामी यशस्वी होण्याची शक्यता वाढते.

मुलांमधील स्व-आदारास चालना देऊन मुलांमधील अपयशाचे चक्र मोडणे पालकांना शक्य असते. याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे अधिकारवादी पालकत्वाची शैली होय. अधिकारवादी पालक हे उबदार, भावनिक दृष्ट्या पाठिंबा पुरवणारे तसेच मुलांच्या वर्तनाविषयी स्पष्ट सिमारेषा असणारे असतात. याउलट इतर पालकत्वाच्या शैलींचा स्व-आदरावर कमी धनात्मक प्रभाव पडतो. अधिक दंडात्मक तसेच नियंत्रित करणारे पालक हे मुलांना तुम्ही अविश्वासार्ह आहात, चांगले निर्णय घेऊ शकत नाहीत असा संदेश देत असतात. अशा संदेशामुळे मुलांच्यामध्ये अपुरेपणाची भावना वाढीस लागते. अतिशय क्षमाशील अथवा दुर्लक्ष करणारे पालक हे मुलांना त्यांच्या प्रत्यक्ष निष्पादनाऐवजी अविचारीपणे स्तुती अथवा प्रशंसा करतात. परिणामी मुलांमध्ये चुकीच्या स्व-आदराची निर्मिती होते.

(II) Social deprivation and self-esteem सामाजिक वंचितता स्व-आदर:

Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

नेहमीच पूर्वग्रह आणि भेदनीकरण अनुभवत असणाऱ्या सामाजिक दृष्ट्या वंचित समूहाचे सदस्य असल्यास तुमचा स्व-आदर यामुळे प्रभावित होण्याची शक्यता असते. भारतासारख्या देशामध्ये जाती आणि आर्थिक स्थिती मुळे सामाजिक वंचनाची निर्मिती होते. या समूहाशी निगडीत मुलांमध्ये साधनसामुग्रीचा अभाव दिसून येतो. जाती-व्यवस्थेमुळे सामाजिक आर्थिक असमानता निर्माण होते परिणामी वंचनाची स्थिती निर्माण होते; वंचित घटकांमधील मुलांच्या मध्ये असे काही मनोसामाजिक घटक निर्माण होतात ज्यामुळे निम्न स्व-संकल्पना आणि निम्न स्व-आदराची निर्मिती होते. त्यांच्यामध्ये अभावनिक प्रेरणा, बाह्य नियंत्रण केंद्र, अपयशाचे व्यक्तिगत अपुरेपणा, लोकांचे आणि तीव्र स्व-मूल्यमापन आणि तीव्र चिंता निर्माण होतात. या मुलांमध्ये अत्यंत निम्न स्व-आदर दिसून येतो त्यांच्यामध्ये सामाजिक स्वीकृतीची गरज भासते. व्यक्तिगत अपुरेपणा, नकारात्मक स्मृती, तीव्र सामाजिक चिंता आणि स्व विषयक निम्न संवेदनाची अनुभूती ही मुले घेत असतात म्हणूनच त्यांच्यामध्ये अपयशाची भीती निर्माण होते. ही संपूर्ण प्रक्रिया भावनिक दृष्ट्या नुकसान देणारी असते.

अल्पसंख्यांक समूह दर्जा आणि स्व-आदर यामधील संबंधित नातेसंबंधाचे स्पष्टीकरण सामाजिक ओळख सिद्धांत (Social identity theory) याद्वारे देता येते. या सिद्धांतानुसार अल्पसंख्यांक समूहाचे सदस्य स्वतःविषयी अधिक नकारात्मक दृष्टिकोन स्वीकारतात. अल्पसंख्यांक समूह सदस्यांना पूर्वग्रह आणि भेदनीकरण कमी होईल असे जरी वाटत असले तरीदेखील या स्थितीस समाजाला दोष देतात. अल्पसंख्यांक समूह सदस्यांमध्ये वांशिक जागृकता वाढीस लागल्याने विभिन्न वांशिक समूहांमधील स्व-आदरातील भेद नष्ट होतो.

Scanned with CamScanner

Scanned by CamScanner